आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

२६ ऑगस्ट २०२६ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- औषध निरीक्षक परीक्षेतल्या पेपरफुटीप्रकरणी MPSC च्या ३ अधिकाऱ्यांसह ६ जणांना अटक

- मुंबईत १ सप्टेंबरपासून रिक्षा भाडे १ रुपयानं, तर टॅक्सी २ रुपयांनी महागणार

- राज्यातल्या शासकीय शाळांमधल्या ५ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांना मोफत चष्मे मिळणार

**आणि**

- कोलंबोतल्या कसोटी सामन्यात भारताकडून फॉलोऑन मिळाल्यावर दिवसअखेर श्रीलंकेला १६ धावांची आघाडी

<><><><><>

मुंबई पोलिसांनी MPSC च्या औषध निरीक्षक परीक्षेतल्या पेपरफुटीप्रकरणी MPSC च्या ३ अधिकाऱ्यांसह एकूण ६ जणांना अटक केली आहे. अटक झालेल्यांमध्ये MPSC चे अवर सचिव आणि कक्ष अधिकारी यांचा समावेश असल्याचं वृत्त आहे. न्यायालयानं या सर्व आरोपींना बुधवारपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

याप्रकरणी MPSC च्या अध्यक्षांच्या राजीनाम्याची मागणी आमदार रोहित पवार यांनी केली आहे. अन्यथा मंगळवारपासून आंदोलन करायचा इशारा त्यांनी दिला. हे मोठं रॅकेट असून याबाबतचा पोलिसांचा चौकशी अहवाल सार्वजनिक झाला पाहिजे, अशी मागणीही त्यांनी केली.

<><><><><>

मुंबईत सीएनजीवर चालणाऱ्या रिक्षा आणि टॅक्सीच्या दरात वाढ होणार आहे. मुंबई महानगर क्षेत्रातल्या टॅक्सीच्या दरात २ रुपये तर रिक्षाच्या दरात एका रुपयाची वाढ करण्याचा निर्णय मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरणानं घेतला आहे. त्यामुळे ग्राहकांना आता पहिल्या दीड किलोमीटर अंतरासाठी टॅक्सीला ३१ ऐवजी ३३ रुपये, तर रिक्षासाठी २६ ऐवजी २७ रुपये मोजावे लागतील. येत्या १ सप्टेंबरपासून हे नवे दर लागू होणार आहेत.

त्यापुढच्या अंतरासाठी, टॅक्सीचं भाडं २१ रुपये ९० पैसे प्रतिकिलोमीटर इतकं होईल. सध्या हा दर २० रुपये ६६ पैसे इतका आहे. तर रिक्षाचं भाडं १८ रुपये २२ पैसे प्रतिकिलोमीटर होणार आहे. सध्या हा दर १७ रुपये ७४ पैसे इतका आहे. टॅक्सी आणि रिक्षा चालकांनी त्यांच्या इलेक्ट्रॉनिक मीटरमध्ये, सुधारित दरांनुसार बदल केल्यानंतरच नवीन दर आकारण्याची परवानगी मिळेल. तसंच बदल करण्यासाठी त्यांना नोव्हेंबर अखेरपर्यंतची मुदत दिली असून बदल न करणाऱ्या चालकांवर कारवाई केली जाईल, असं प्रादेशिक परिवहन कार्यालयानं स्पष्ट केलं आहे.

<><><><><>

चाकण-भोसरीच्या औद्योगिक पट्ट्याला नवी ऊर्जा देणा-या ४९ सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांसोबतच्या  सामंजस्य कराराच्या माध्यमातून २ हजार ३२० कोटी ९७ लाख रुपयांची गुंतवणूक प्रस्तावित आहे. या गुंतवणुकीतून उत्पादनक्षमता वाढण्यासोबतच हजारो रोजगारांच्या नव्या संधी निर्माण होतील आणि ग्रोथ इंजिन असणाऱ्या पुणे परिसरातल्या औद्योगिक परिसंस्थेला आणखी बळ मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी व्यक्त केला.

<><><><><>

राज्यातल्या शालेय विद्यार्थ्यांच्या डोळ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्याच्या दृष्टीनं शालेय शिक्षण विभागानं  एक त्रिपक्षीय  सामंजस्य करार केला आहे. या करारानुसार शासकीय शाळांमधल्या पाचवी ते दहावीच्या 20 लाख विद्यार्थ्यांच्या डोळ्यांची तपासणी केली जाणार असून  दृष्टीदोष आढळलेल्या गरजू विद्यार्थ्यांना नंबरचे चष्मे मोफत उपलब्ध करून दिले जातील.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांच्या उपस्थितीत आज मुंबईत हा करार झाला.

<><><><><>

परदेशी नागरिक अवैधपणे सीमा ओलांडून भारतात येतात आणि भारतीय नागरिकत्व मिळवण्यासाठी गैर मार्गांनी आधार आणि पॅनकार्ड मिळवतात, याबद्दल मुंबई उच्च न्यायालयानं चिंता व्यक्त केली असून ही समस्या सोडवण्यासाठी केंद्र सरकारनं त्वरित पावलं उचलण्याची गरज अधोरेखित केली आहे. विविध यंत्रणांमधला समन्वयाचा अभाव आणि

कागदपत्रांची पडताळणी यावर विशेष लक्ष देण्याची बाब न्यायालयानं लक्षात आणून दिली आहे. अशा व्यक्ती राष्ट्र विरोधी कारवायांमध्ये सामील असू शकतात असं न्यायमूर्ती ए एस गडकरी आणि न्यायमूर्ती कमल खाता यांच्या पीठानं नमूद केलं आहे. आधार कायद्यात आवश्यक सुधारणा करून अशा व्यक्तींना हुडकून काढणं आणि त्यांना माघारी पाठवणं याला प्राधान्य देण्याचे निर्देश त्यांनी दिले आहेत.

<><><><><>

सायबर गुन्हेगार पोलीस, सीबीआय किंवा न्यायाधीशांच्या नावानं नागरिकांना भीती दाखवून, घाबरवून फसवणूक करतात. त्यामुळे नागरिकांनी अशा कोणत्याही प्रकारांना बळी न पडता, सायबर फसवणूक झाली तर तातडीनं '१९३०' या सायबर हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधावा, असं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज केले. ते मुंबईत महाराष्ट्र सायबरच्या वतीनं आयोजित कार्यक्रमात 'डिजिटल अरेस्ट' या सायबर जनजागृती लघुपटाचं आणि '१९३० महाराष्ट्र सायबर अँथम'चं लोकार्पण करताना बोलत होते.

<><><><><>

कोलंबो इथं सुरु असलेल्या दुसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्यात, आज चौथ्या दिवसअखेर श्रीलंकेनं १६ धावांची आघाडी घेतली आहे.

भारतानं पहिल्या डावात केलेल्या ५०३ धावांचा पाठलाग करताना श्रीलंकेचा पहिला डाव आज २९० धावावर संपला. सोनल दिनुषानं शतक झळकावलं. भारतातर्फे प्रसिध कृष्णा आणि मानव सुतारनं प्रत्येकी ३, तर सारांश जैननं २ गडी बाद केले. पहिल्या डावात २१३ धावांची आघाडी मिळाल्यानं भारतानं श्रीलंकला फॉलोऑन दिला. त्यानंतर, श्रीलंकेनं दिवसअखेर ६ बाद २२९ धावा करत, १६ धावांची आघाडी घेतली.

आजचा खेळ थांबला तेव्हा सोनल दिनुषा ७, तर केशरा निवुंता ३ धावांवर खेळत होता.

<><><><><>

नेपाळमध्ये आलेल्या पुरात १७ जणांचा मृत्यू झाला असून सुमारे ५०० जण बेपत्ता आहेत. बेपत्ता व्यक्तींमध्ये १०५ भारतीय आहेत. प्रारंभिक माहितीनुसार भूकंपामुळे हिमस्खलन होऊन बर्फाच्या वितळलेल्या पाण्याचा लोंढा कोसी नदीत येऊन अचानक पूरस्थिती निर्माण झाली. तिबेट सरहद्दीलगत असलेल्या रसुवा जिल्ह्यात आज सकाळी भोटे

कोसी नदीला अचानक पूर आला. सुरक्षा दलांनी विविध ठिकाणांहून ८० जणांची सुखरूप सुटका केली आहे.

नेपाळमध्ये पुरामुळे झालेल्या जीवितहानीबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दुःख व्यक्त केलं आहे. प्रधानमंत्री मोदी यांनी नेपाळचे प्रधानमंत्री बालेन्द्र शाह यांच्याशी संवाद साधून या संकटाच्या क्षणी भारत नेपाळच्या पाठीशी खंबीरपणे उभा असल्याचं सांगितलं.

दरम्यान नेपाळमध्ये आलेल्या पुरामुळे बिहारमधल्या गंडक नदीच्या पाणीपातळीत वाढ होण्याची शक्यता आहे. बिहारमधल्या सहा जिल्ह्यांना सतर्कतेच्या सूचना देण्यात आल्या असून गोपालगंज आणि बेतिहा इथं एनडीआरएफच्या तुकड्या तैनात करण्यात आलं आहे.

नेपाळमध्ये आलेल्या पुराच्या पार्श्वभूमीवर सशस्त्र सीमा दलानं भारत-नेपाळ सरहद्दीलगतच्या आपल्या सर्व तुकड्यांना सतर्क राहण्याचे आदेश दिले आहेत. सीमा क्षेत्रात मदत आणि बचाव कार्यासाठी १८ तुकड्या तैनात करण्यात आल्या असून सात राखीव ठेवण्यात आल्या आहेत.

<><><><>

कथित ऑनलाईन गुंतवणूक फसवणुकीप्रकरणी गुजरातमधल्या सुरत शहर सायबर गुन्हे शाखेनं महाराष्ट्रातल्या परभणी जिल्ह्यातल्या दोन जणांना आज अटक केली. संबंधित व्यक्तींनी शेअर बाजारातील गुंतवणुकीचं इन्स्टाग्रामच्या माध्यमातून आमिष दाखवून सुमारे ९ लाख ५८ हजार रुपयांची फसवणूक केल्याची तक्रार सुरतमधल्या व्यक्तीनं केली होती. या प्रकरणी अधिक तपास सुरू आहे.

<><><><>

महसूल गुप्तचर विभागाने पुणे रेल्वे स्थानकावर ३ कोटी ४१ लाख रुपये किमतीच्या अंमली पदार्थांसह एका महिला प्रवाश्याला अटक केली आहे. दिल्लीवरून पुण्याला जाणाऱ्या या गाडीत अंमली पदार्थांची तस्करी होत असल्याची माहिती विभागाला मिळाली होती.

<><><><>

देशभरात ईद-ए-मिलाद-उन-नबी आज साजरी होत आहे. यानिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत. ईद-ए-मिलाद-उन-नबीचा सण हा मोहम्मद पैगंबर यांच्या शिकवणींचं स्मरण करण्याचा दिवस आहे. त्यांची शिकवण आपल्याला सदाचार आणि कर्तव्यनिष्ठेच्या मार्गाचे

अनुसरण करण्यास प्रेरित करते. मोहम्मद पैगंबर यांचे उदात्त आदर्श आपल्याला एक सर्वसमावेशक आणि विकसित भारत घडवण्यासाठी सक्रियपणे योगदान देण्यास प्रेरित करत राहोत, असं राष्ट्रपतींनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

हा सण सर्वांच्या जीवनात सुखशांती, समृद्धी घेऊन येवो, असं उपराष्ट्रपतींनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. हा पवित्र दिवस आपल्या समाजात एकोपा, आनंद आणि बंधुभाव अधिक दृढ करो. दया, माणुसकी आणि समाजासाठी योगदान देण्याची भावना आपल्याला सदैव मार्गदर्शित करो, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे.

राज्यातही सर्वत्र शांततेत ईदच्या मिरवणूक काढण्यात आल्या.

<><><><><>

गणेशोत्सव आणि दहीहंडी उत्सवाच्या पार्श्वभूमीवर तीव्र आवाजाच्या डीजेवर बंदी कायम असल्याचं पुणे पोलिसांनी स्पष्ट केलं आहे. उत्सवाच्या काळात मोठ्या आवाजात संगीत वाजवून नागरिकांना त्रास होऊ नये, तसंच ध्वनिप्रदूषणाच्या निर्धारित मर्यादांचं पालन व्हावं, यासाठी पोलिसांकडून नियमांची काटेकोर अंमलबजावणी केली जाणार आहे.

<><><><><>

येत्या दोन दिवसात कोकणात बहुतांश ठिकाणी, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात काही ठिकाणी तर विदर्भात अनेक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

//<><><><><>//